# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६.　　विस्तार क्र.२२५　　proumc321@gmail.com


२६-३-२०२४
१२:००

दिनांक : २३/०३/२०२४

# प्रेसनोट

**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम**

**जाहिर आवाहन**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अतर्गत उल्हासनगर शहरात केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वावर सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सन २००३ पासून राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.




World T.B. Day 2024 : दरवर्षी २४ मार्च हा दिवस 'जागतिक क्षयरोग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने जागतिक आरोग्य संघटनेकडून आजच्या दिवशी उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा व विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात डी.टी. कलानी कॉलेजचे विद्यार्थी रांगोळी स्पर्धेत, निबंध स्पर्धेत सहभागी झाले. त्या माध्यामातून या जीवघेण्या आजारापासून जगभरातल्या लोकांमध्ये जागरुकता निर्माण केली जाते. २४ मार्च १८८२ साली जर्मन फिजिशियन आणि मायक्रोबायोलॉजिस्ट रॉबर्ट कॉक्स या जीवघेण्या आजाराच्या बॅक्टेरियाचा शोध लावला होता. त्यामुळे क्षयरोगाच्या निदानामध्ये आणि उपचारामध्ये मोठी मदत मिळाली होती. इ.स. १८८२ साली रॉबर्ट कॉक्स यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला होता. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञांच्या परिषदेत मांडला आणि त्याला दिनांक २४ मार्च रोजी मान्यता मिळाली. म्हणून दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम तयार करण्यात येते. क्षयरोग हा एक संक्रमक आजार आहे. मायक्रो टयुबरक्लुलोसिस बॅक्टेरियामुळे क्षयरोग होतो.या रोगाचा क्षयरोग ग्रस्त रोग्याच्या खोकणे किंवा शिंकणे या माध्यमातून अन्य लोकांमध्ये प्रसार होतो. या रोगाबद्दल योग्य मार्गदर्शन आणि उपचार केल्यास याचे निदान होऊ शकते. जर या रोगामध्ये निष्काळजीपणा केला तर त्यामुळे मृत्यु ओढवू शकतो.

जागतिक आरोग्य संघटनेने २०३० पर्यंत या जीवघेण्या आजाराचे जगातून उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी लक्ष निर्धारण आणि नियोजन करण्यात आले आहे. तर दुसरीकडे, भारताने २०२५ पर्यंत देशातून या रोगाचे उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार जगभरात दर दिवशी ४००० लोकांचा मृत्यु क्षयरोगाने होतो. भारतात क्षयरोगाच्या रुग्णांची संख्या मोठी असून आशियाई देशात भारताचा क्रमांक पहिला आहे. यामुळे भारत सरकारच्या वतीने जागतिक आरोग्य संघटनेने ठरवलेल्या लक्षाच्या आधीच देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आला आहे.

23/3/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.